# <u>नियम पुस्तिका - आठ</u>

**निर्णय घेण्याच्या प्रक्रियेत अनुसरण्यात येणारी कार्यपद्धती तसेच पर्यवेक्षण आणि उत्तरदायित्व प्रणाली -**

- प्रमुख अभियंता (मलनि:सारण प्रकल्प) खात्यामध्ये अनुक्रमे नियोजन व संकल्पचित्रे विभाग आणि बांधकाम विभाग यांचा समावेश होतो.
- मुंबईतील विकास नियोजन रस्ता / महापालिका रस्ता यांवर मुंबई मलनि:सारण प्रकल्प - बृहत आराखडा (2002 ते 2025) अनुसार सुचविलेली मलनि:सारण वाहिनी टाकण्याची कामे अग्रक्रम तत्वाद्वारे प्रस्ताविणे. त्याचप्रमाणे जनतेच्या, नगरसेवकांच्या, सहाय्यक आयुक्त इत्यादींच्या विनंतीनुसार विविध विभागात मलनि:सारण वाहिनी टाकण्यासाठी संदर्भित कामांच्या ठिकाणांचे निरीक्षण संबंधीत कर्मचा-कडून करण्यात येऊन आणि प्रारंभिक सर्वेक्षण आणि तांत्रिक सुसाध्यता पडताळल्यानंतर प्रस्तावित मलनि:सारण वाहिनी टाकण्याच्या कामाचे कार्यालयीन अंदाज, आराखडे आणि एल-सेक्शन तयार करणे.
- प्रस्तावित मलनि:सारण वाहिन्यांच्या कामासाठी सक्षम अधिका-यांची प्रशासकीय आणि तांत्रिक मंजूरी घेण्यात येते. त्या अनुसार आर्थिक वर्षासाठी अर्थसंकल्पीय तरतूद प्रस्ताविणे. अर्थसंकल्पीय तरतुदीस मान्यता प्राप्त झाल्यानंतर सदर कामे कार्यान्वित करण्यासाठी कंत्राटदारांची नेमणुक करण्याकरिता विहित स्थानिक वर्तमानपत्रांमध्ये ई-निविदा सुचना देउन तसेच महापालिका संकेतस्थळावर ई-निविदा सुचना अपलोड करुन ई-निविदा मागविणे.
- सुयोग्य कंत्राटदारांकडून निविदा प्राप्त झाल्यानंतर सदर निविदांचे मुल्यमापन करण्यात येते. निविदा समितीपुढे सदर निविदा विचारार्थ ठेवण्यात येतात. मुंबई म.न.पा. अधिनियम कलम ६९(क) अंतर्गत आवश्यक असल्यास तसेच विशेषत्वाने नमूद केलेले नसल्यास लघुत्तम प्रतिसादात्मक निविदाकाराची शिफारस केलेला प्रस्ताव मंजुरीसाठी सादर करण्यात येतो.
- स्थायी समितीची मान्यता प्राप्त झाल्यानंतर कामाचा प्रारंभ करण्यासाठी कंत्राटदारांना कार्यादेश देण्यात येतो. वरील बाबीनुसार अतिरिक्त आयुक्त, नगरसेवक यांची विनंती प्राप्त झाल्यापासुन साधारणपणे चार महिन्यानी प्रकल्पाला आरंभ होतो.
- मनपा आयुकतांकडून वेळोवेळी निर्गमित केल्या जाणा-या परिपत्रके ज्यामध्ये निर्णय घेण्याची प्रक्रिया नमूद केलेली आहे. तसेच विविध स्तरांवर म्हणजे प्रमुख अभियंता (मलनि:सारण प्रकल्प), उपायुक्त (अभियांत्रिकी), अतिरिक्त आयुक्त (प्रकल्प) यांना निर्णय घेण्याचे अधिकार प्रत्यायुक्त करण्यात आलेले आहे. संस्थात्मक अधिकार श्रेणीनुसार सदर निर्णय प्रक्रिया कार्यान्वित केली जाते.
- मलनि:सारण प्रकल्प खात्याच्या अंतर्गत असलेल्या बांधकामे / सुक्ष्मबोगदा विभागामार्फत प्रस्तावित मलनि:ॅसारण वाहिन्या टाकण्याचे काम विहित मुदतीत केले जाते. पर्यवेक्षीय अधिका-यांकडून सदर कामे निकषांनुसार महापालिकेतर्फे नियुक्त केलेल्या कंत्राटदारामार्फत करुन घेतली जातात तसेच हया कामाच्या विविध नोंदवहया, देयक प्रमाणपत्रे तयार करुन परिरक्षित करण्यात येतात. सदर मलनि:सारण वाहिन्या टाकण्याचे काम पूर्ण झाल्यावर त्या प्रमुख अभियंता (मलनि:सारण प्रचालन) यांजकडे प्रचालन व परिरक्षण करण्याकरीता सोपविल्या जातात.
- निर्णय प्रक्रियेत प्रमुख अभियंता (म.प्रकल्प.)/ उपायुक्त (अभियांत्रीकी)/ अति.आयुक्त (प्रकल्प) श्रेणीचे अधिकारी सहभागी असतात.
- अतिरिक्त आयुक्त (प्रकल्प) / म.न.पा. आयुक्त हे निर्णयाचे अंतिम प्राधिकारी असतात.

  संबंधित विभागाने पुरवावयाची माहिती पुढे नमूद केल्यानुसार आहे.

## नियोजन व संकल्प चित्रे

| 1 | विषय ज्यावर निर्णय घ्यावयाचा आहे | तांत्रिक | प्रशासकीय | अन्य |
|---|---|---|---|---|
| 2 | मार्गदर्शनतत्वे / निर्देशन जर असल्यास | विनिर्देश, आराखडे, अंदाज, दरसूची, म.न.पा. अधिनियम, कराराच्या सर्वसाधारण अटी | म.न.पा.सेवा नियमावली, परिपत्रके, म.न.पा.अधिनियम | ----- |
| 3 | कार्यान्वितीकरण प्रक्रिया | अनुसूची, करार/ निविदेच्या अटी व शर्ती | म.न.पा. अधिनियम अनुसूची उपविधी | निरंक |
| 4 | निर्णयप्रक्रियेत सहभागी असणा-या अधिका-यांची पदनाम | प्रमुख अभियंता<br>उपायुक्त (अभियांत्रिकी)<br>अतिरिक्त आयुक्त (प्रकल्प) | | |
| 5 | उपरोक्त नमूद केलेल्या अधिका-यांशी संपर्क करण्याबाबत माहिती | प्रमुख अभियंता (म.प्रकल्प)<br><br>उपायुक्त (अभियांत्रिकी) मुंबई - 400 001 | दुसरा मजला, हब इंजिनिअरींग इमारत, डॉ. ई. मोझेस रोड, वरळी, मुंबई-400018<br>पहिला मजला, हब इंजिनिअरींग इमारत, डॉ. ई. मोझेस रोड, वरळी, मुंबई-400018 | |
| 6 | निर्णयाबाबत समाधानी नसल्यास अपील कोठे आणि कसे करावे | अतिरिक्त आयुक्त (प्रकल्प) | दुसरा मजला, म.न.पा. मुख्यालय, महापालिका मार्ग, नवीन विस्तारीत इमारत मुंबई - 400 001 | |

| अ.क्र. | कामाचे स्वरुप | संबंधित अधिकारी |
|---|---|---|
| 1 | बृहन्मुंबई महानगरपालिका हद्दीत मलनि:सारण वाहिनी टाकण्याचे नियोजन करणे, संकल्प चित्रे बनविणे व निविदा तयार करणे आणि मायक्रो टनेलिंग पद्धतीने मलनि:सारण वाहिनी टाकण्याच्या कामावर देखरेख करणे. | उप प्रमुख अभियंता (म.प्र.) नि. व सं. चित्रे. दुसरा मजला, हब इजिनिअरींग इमारत, डॉ. ई. मोझेस रोड, वरळी, मुंबई-400 018 |
| 3 | खाते प्रमुख | प्रमुख अभियंता (म.प्र.)<br>दुसरा मजला, हब इजिनिअरींग इमारत, डॉ. ई. मोझेस रोड, वरळी, मुंबई-400 018 |

**बांधकामे**

| | | | |
|---|---|---|---|
| 1 | निर्णय घ्यावयाचा विषय | कामाची स्थिती व अडचणीनुसार निविदा कामांमध्ये अकल्पित बदल | |
| 2 | रुपरेषा निर्देशन जर असल्यास | कराराच्या सर्वसाधारण अटीनुसार निविदा कामातील बदल जर असल्यास. | |
| 3 | कार्यान्वितीकरणाची प्रक्रिया | कार्यान्वितीकरणाच्या दरम्यान बदल आढळल्यास कळविणे आणि सक्षम अधिका-यांची मंजूरी प्राप्त करणे. | |
| 4 | निर्णयप्रक्रियेत सहभागी असणा-या अधिका-यांची पदनाम | दुय्यम अभियंता (कामाचे नियंत्रक)<br>सहाय्यक अभियंता<br>कार्यकारी अभियंता<br>उप प्रमुख अभियंता<br>प्रमुख अभियंता<br>उपायुक्त (अभियांत्रिकी)<br>अतिरिक्त आयुक्त (प्रकल्प) | |
| 5 | उपरोक्त अधिका-यांची संपर्क माहिती | **पदनाम** | **कार्यालयीन पत्ता** |
| | | उप प्रमुख अभियंता (म.प्र.) बांधकामे आणि प्रमुख अभियंता (म.प्र.) | दुसरा मजला, हब इजिनिअरींग इमारत, डॉ. ई. मोझेस रोड, वरळी, मुंबई-400 018 |
| | | उपायुक्त (अभियांत्रिकी) | पहिला मजला, हब इंजिनिअरींग इमारत, डॉ. ई. मोझेस रोड, वरळी, मुंबई- 400 018 |
| 6 | उपरोक्त निर्णयाने समाधान न झाल्यास, अपिल करावयाचे ठिकाण आणि स्वरुप | अतिरिक्त म.न.पा. आयुक्त (प्रकल्प)/ म.न.पा. आयुक्त करारातील अटीनुसार दाखल करणे | दुसरा मजला, म.न.पा. मुख्यालय, महापालिका मार्ग, नवीन विस्तारीत इमारत मुंबई-400 001 |

| अ.क्र. | कामाचे स्वरुप | संबंधित अधिकारी |
|---|---|---|
| 1 | म.न.पा. हद्दीमध्ये मलनिःसारण वाहिन्या टाकण्याच्या कामाचे कार्यान्वितीकरण व पर्यवेक्षण | उप प्रमुख अभियंता (म.प्र.) बांधकामे.<br>दुसरा मजला, हब इजिनिअरींग इमारत, डॉ. ई. मोझेस रोड, वरळी, मुंबई-400 018 |
| 2 | खाते प्रमुख | प्रमुख अभियंता (म.प्र.)<br>दुसरा मजला, हब इजिनिअरींग इमारत, डॉ. ई. मोझेस रोड, वरळी, मुंबई-400 018 |